# -: जिल्हा परिषद,गडचिरोली :-

*****************

## अनुकंपा तत्वावर वर्ग-3 च्या पदावर संभाव्य नियुक्ती संबंधाने माहिती पुर्ण प्रकरणाची सुधारीत तात्पूरती सूची.

**सन- 2019**

**अनुकंपा तत्वावर वर्ग-3 चे पदावर अनुकंपा तत्वावर संभाव्य नियुक्ती करीता उमेदवारांची संख्या:-** 145

**अनुकंपा तत्वावर वर्ग-4 चे पदावर अनुकंपा तत्वावर संभाव्य नियुक्ती करीता उमेदवारांची संख्या:-** 06

# जिल्हा परिषद, गडचिरोली

## सामान्य प्रशासन विभाग

दुरध्वनी क्र: 07132-297463 Email :-zpgadmail@gmail.com

क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-1(ब)/ अनुकंपा/ 328 /2021 दिनांक :- 05/ 02/ 2021

**संदर्भ**:- 1.शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. अकंपा-1093/2335/प्र.क्र. 90/93/आठ, दिनांक 12.03.1997.
2.शासन निर्णय,सा.प्र.वि. क्र. अकंपा-1217/प्र.क्र.102/आठ, दिनांक- 21.09. 2017.
3. कार्यालयीन परिपत्रक क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-(ब)/अनुकंपा/1120/20 दिनांक 03.04.2020.
4. कार्यालयीन परिपत्रक क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-(ब)/अनुकंपा/1397/20 दिनांक 21.09.2020.

## प रि प त्र क :-

जिल्हा परिषद,गडचिरोली अंतर्गत दिवंगत झालेल्या कर्मचा-यांचे नातेवाईकांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासंबंधाने माहे 11 फरवरी 2020 अखेरपर्यंत प्राप्त अनुकंपा धारकांना संभाव्य नियुक्ती देण्यासंबंधाने माहिती **पूर्ण असलेले 149 प्रकरणांची तात्पुरती** सूची जिल्हा परिषद/पंचायत समितीचे नोटीस बोर्ड, जिल्हा परिषद चे संकेतस्थळावर (www.zpgadchiroli.in किंवा www.zpgadchiroli.org) वर प्रकाशित करण्यात आली व सुचीतील उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास परिपत्रक प्रसिध्दीच्या दिनांकापासुन 30 दिवसाचे आत आक्षेप मागविण्यात आले. एकुण प्राप्त 21 उमेदवारांचे आक्षेपाचे निराकरण करुन संदर्भ-4 चे परिपत्रकान्वये सदर सुची अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात आली.

सदर प्रसिध्द यादीचे अनुषंगाने अनुकंपा तत्वावर निवड करण्यास संभाव्य निवड प्रक्रिया समुपदेशनाने पार पाडण्यास प्रस्तावीत करण्यात आली. समुपदेशन प्रक्रियेकरिता वरील प्रसिध्द यादीतील सर्व उपस्थित उमेदवारांना प्रक्रियेबाबत माहिती देण्यात आली. परंतु उपस्थित उमेदवारांकडुन प्राप्त आक्षेपाचे अनुषंगाने वरील परिपत्रकान्वये प्रसिध्द यादीचे पुनश्च अवलोकन करुन सदर यादीतील उमेदवारांचे जेष्ठताक्रम सुधारण्याचे निश्चित करण्यात आले.

त्यानुसार संदर्भ-01 व 02 व इतर अनुषंगीक शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी येणा-या अर्जाच्या जेष्ठतेच्या दिनांकापासुन तसेच उमेदवार अज्ञान असल्याचे बाबतीत ते सज्ञान झाल्याचे दिनांकापासुन जेष्ठता क्रम लावुन शैक्षणीक अर्हता, सेवाभरती नियम, शासन निर्णयातील विद्यमान तरतुदी इ. बाबी विचारात घेऊन वर्ग-03 चे पदावर संभाव्य नियुक्तीकरिता एकुण 143 तसेच निर्णयाकरिता प्रलंबित असलेल्या 02 प्रकरणावरील अंतिम निर्णयाअंती निश्चित झालेले असे एकुण 145 उमेदवरांची तसेच वर्ग-4 चे पदावर संभाव्य नियुक्तीकरिता एकुण 06 उमेदवारांची स्वतंत्र तात्पुरती प्रतिक्षाधीन सुची याव्दारे सुधारितरित्या प्रसिध्द करण्यात येत आहे.

सबब वरील माहिती पुर्ण प्रकरण असलेल्या अनुकंपाधारक उमेदवारांनी प्रसिध्द केलेल्या तात्पुरत्या सुचीचे अवलोकन करून त्यात काही आक्षेप नोंदवावयाचे असल्यास सदर सूची जिल्हा परिषद/पंचायत समितीचे नोटीस बोर्ड / जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ (www.zpgadchiroli.in किंवा www.zpgadchiroli.org) वर प्रसिध्द झाल्याच्या **दिनांकापासून 15 दिवसाचे आंत** या कार्यालयास पृष्ठार्थ दस्ताऐवजासह लेखी आक्षेप नोंदवावे.

विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**(कुमार आशिर्वाद, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

**<u>प्रतिलिपी :-</u>**

1. खाते प्रमुख,जिल्हा परिषद,गडचिरोली (सर्व)------------------------------------------------------------
2. गट विकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व) ------------------------------------------------------------

यांना माहिती तथा पुढील आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. सदर्हु पुर्ण असलेले प्रकरणाची तात्पुरती प्रतिक्षाधिन सूची जिल्हा परिषद, गडचिरोली चे संकेतस्थळ (www.zpgadchiroli.in किंवा www.zpgadchiroli.org ) वर प्रसिध्द करण्यात आलेली असुन सदर सूची आपले नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.

**(कुमार आशिर्वाद, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**